पॉप्युलर प्रकाशन

प्रिय रसिक

आपल्यासाठी आणि मित्रांसाठी

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६, दूरध्वनी : ०२२ - २३५३०३०३
Email: info@popularprakashan.com / Website: www.popularprakashan.com
/popularprakashan popularprakashan @PopularPrakashn

अंकविशेष

मांजरांच्या 'म्याऊं'ची भाषांतरे...
— राधिका कुंटे

अभिनंदन
कवी प्रफुल्ल शिलेदार

A Couple Of
Different Strokes

Baking Mantra
CAKES

दास्तान-ए-तुर्की
नक्षी-दार — प्रवीण कलंत्री

मांजरांच्या 'म्याऊं'ची भाषांतरे...

'प्रश्न आणि त्याचं उत्तरही म्हणजे दस्तुरखुद्द जीवन हेच आहे.' ही आहे गेझे या मांजरीने तिच्या रोजनिशीत केलेल्या अनेक नोंदींपैकी एक नोंद. 'हवेत तरंगणाऱ्या कागदांवर गंधरूपात लिहिलेल्या या नोंदी' वाचताना गेझेच्या मनात नीना, आर्थर आणि किर्ली यांचे विचार सतत येत होते. तिने त्यांनाही छोटीशी पत्रे लिहिली. पुढे ती वाचलीही गेली आणि त्यांचा विचारही केला गेला. ... ***तुर्की मांजराकडून आलेली पत्रे*** *या ओया बाय्दोर यांच्या कादंबरीचे भाषांतर ज्येष्ठ साहित्यिक मकरंद साठे यांनी केले आहे. ही मांजरांची आणि माणसांच्या आत्मशोधाची, तत्त्वज्ञानाची भक्कम जोड असलेली कथा आहे.*

नीना, किर्ली, आर्थर, गेझे, योल्डाश, किस्मत, सफीनाझ, पार्सिफल आदी मांजरी-बोके आणि त्यांच्या मालक-मालकिणींची ही कथा. या मांजरांचे मालक १९८० मध्ये तुर्कस्तानात झालेल्या लष्करी उठावानंतर देश सोडून युरोपातील विविध देशांत आश्रय घ्यायला भाग पडलेले लोक आहेत. १९८९-९० या काळात बर्लिन भिंत आणि समाजवादी व्यवस्था कोसळल्याने त्यांच्या आशा, ओळख, श्रद्धाही कोसळतात. परक्या भूमीवरचा त्यांचा प्रवास अधिकच अवघड, शोकात्म, भावनिक-शारीरिकदृष्ट्या थकवणारा, अधिकाधिक प्रश्नार्थी होतो. त्यांचे वैयक्तिक जीवन, आपापसातील ताणेबाणे, मतभेद, भौगोलिक-मानसिक अंतरे, सामाजिक-आर्थिक दरी, विचारांचे परीघ असे अनेक मुद्दे यात येतात. तीच गोष्ट त्यांच्या मांजरांची. हे मांजरे आणि बोके यांचे जीवन, त्यांचे आपापसातले नाते, मित्रत्व-शत्रुत्व, उपजत कुतूहल-वृत्ती, त्यांच्या नैसर्गिक प्रेरणा-वागणे आणि त्यांच्यावर या मालकांची पडणारी सावली... कधी मांजरे माणसांसारखी वागतात तर कधी माणसे मांजरांसारखी. कधी त्यांच्या सभा होतात, कधी सगळे शेवटचे का होईना

एकत्र जमतात. विचारमंथन करतात. त्यातून काही निष्कर्ष निघो वा न निघो ते भेटणेही तितकेच महत्त्वाचे असते. विशेष म्हणजे माणसांना नाव-आडनाव नाही. नाव फक्त मांजरांनाच दिले आहे. या सहजीवनात कुणी शेवटपर्यंत साथ निभावते. कुणी एखाद्या टप्प्यावर सोडून जाते. मग कधी ते मांजर असते तर कधी मालक... त्यांच्याविषयीच्या काही 'मांजरनोंदी' पुढील प्रमाणे.

आर्थरला त्याच्या मालकाने भागीदाराप्रमाणे वागवल्यावर आर्थरच्या अस्मितेचा जो एक हिस्सा कमी कमी होत नाहीसाच झाला होता तो जोमानं परत येत असल्याचे त्याला जाणवले. आपला मालक निघून जाईल किंवा आपल्याला सोडून जाईल या दोन्ही गोष्टींची त्याला वाटणारी भीती आता नाहीशी झाली होती. त्याला मुक्त झाल्यासारखे वाटत होते. मुक्त, स्वतंत्र आणि सार्वभौम. त्याला मांजर झाल्यासारखे वाटत होते.

योल्डाशने त्याच्या मृत मालकाजवळून उठून जाताना शेवटचे 'म्याऊं' केले त्याचा अर्थ होता- 'आता हे अति झालं... सहन होण्याच्या पलीकडे...'

गेझेला ओट्टो हा कुत्रा भेटतो. त्यांची जगावेगळी मैत्री होते. काही कारणाने त्यांच्यात दुरावा येतो. 'मला ओट्टो व्हायचे नाही,' असा निश्चय ती मनाशी करते. पुढे स्वतःची मातृत्वाची आस पूर्ण करण्याचे स्वातंत्र्यही घेते.

किर्लीवर मनापासून प्रेम करणाऱ्या किस्मतच्या तीन आश्चर्यकारक गोष्टी... त्यातली एक गोष्ट होती- 'सत्ताधीश आणि ज्यांच्यावर सत्ता असते, ते, जे राज्य करतात आणि ज्यांच्यावर राज्य केले जाते ते... आणि जोपर्यंत सत्ताधीश अस्तित्वात आहेत तोपर्यंत त्यांचा प्रतिकार करणारे लोक नेहमीच अस्तित्वात असतील. आपल्या मालकांसारखे लोक...'

नीनाच्या मालकिणीने एक प्रबंध लिहिला – 'निर्वासित मांजरं.' त्यावर नीनाची प्रतिक्रिया– 'या गोष्टींमध्ये मांजरांबद्दल फारशी नवी किंवा महत्त्वाची अशी काहीही माहिती दिलेली नाहीये. परंतु ज्या मांजरांना मानवांबाबत

जास्त कळून घेण्याची इच्छा असेल त्यांच्यासाठी हे लेखन उपयोगाचं होईल. ‘निर्वासित मांजरं’ वाचायला लागल्यानंतर मला माझ्या मालकिणीविषयी आणि तिच्या मित्रांविषयी थोडं वाईट वाटायला लागलं, त्यांची थोडी दया यायला लागली. मला आधी वाटलं होतं त्यापेक्षा त्यांची आयुष्यं खूपच जास्त अवघड झालेली आहेत हे मला आता कळलं आहे. पण आता कदाचित हे कळल्यामुळेच, मला त्यांच्याविषयी जास्तच प्रेम वाटायला लागलं आहे. साहित्यिक अंगाने पाहायचं झालं तर, स्वतःविषयी किंवा तिच्यासारख्या माणसांविषयी लिहिण्यासाठी मांजरांचा वापर करून घेणं यातून एक प्रकारची दुर्बलता जाणवते. ती चांगली लेखिका नसण्याचा तो परिणाम असण्याची शक्यता आहे. तिच्यात एकंदरीनेच प्रतिभेचा अभाव असण्याची शक्यता आहे असा त्याचा अर्थ, नाहीतर मानवाची स्वयंलक्षी आणि स्वयंकेंद्रित वृत्ती, तसंच आयुष्य आणि निसर्ग यांची एकात्मकता त्यांच्या ध्यानात न येणं यांचा तो परिणाम आहे. याचं भाषांतर मांजर-भाषेत झालं तर मानवांना

समजून घेण्यासाठी एक उत्तम संहिता आपल्याला उपलब्ध होईल.' नंतर नीनाच्या मनात आलं की, हे काम किर्लीनेच केलं पाहिजे आणि त्यात ती तिला मदत करू शकेल.

किर्लीच्या डोक्यात उजेड पडतो की, 'त्यांनी प्रश्न विचारला आणि त्याला उत्तर नव्हतं.' किर्ली बोटीवरून उतरणाऱ्या माणसांच्या पायांपासून दूर असलेल्या धक्क्याच्या दूरवरच्या टोकाकडे चालत गेली. सूर्यास्त होत होता. छोटे-मोठे भोंगे वाजवत आणि धुराचे लोट हवेत सर्वदूर सोडत बोट धक्का सोडून निघाली. बोटीने समुद्रात मागे सोडलेल्या फेसाळ लाटांवर आणि त्यांच्याभोवती काही मांजर-शब्द काही वेळ नाचले आणि मग समुद्राच्या गहराईत नाहीसे झाले : पर्रर्र, माउं, म्याऊं ?...

एका आगळ्या आणि काळाला समांतर अशा मांजर-मानव विश्वात घेऊन जाणाऱ्या या कादंबरीचे साजेसे मुखपृष्ठ मिलिंद कडणे यांनी रेखाटले आहे. 'पहिल्या प्रकरणाआधी मांजरी सोडता या कादंबरीतील सर्व पात्रे काल्पनिक आहेत' असे वाक्य आवर्जून नमूद केले आहे. मकरंद साठे यांनी मांजर-माणूस यांच्या विचार-भावनांच्या विश्वाचा

अगदी नेमक्या आणि नेटक्या शब्दशैलीत वेध घेतला आहे. इतिहास, भूगोल, वर्तमान, पर्यावरण, निसर्ग प्रेरणा, मानव-प्राणी संबंध, मानसिकता, राजकारण, युद्धकारण, अर्थकारण, हितसंबंध, अस्थिरता आदी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश या कादंबरीत मोठ्या खुबीने केलेला आहे. मांजर असणे-माणूस असणे या अवस्थांची मोठीच गुंतागुंत कथन केली आहे.

नीनाच्याच शब्दांत सांगायचे तर - 'तुर्की मांजराकडून आलेली पत्रे वाचल्यानंतर कोणताही माणूस मांजरींकडे पूर्वीप्रमाणे पाहू शकणार नाही आणि कोणतीही मांजर माणसांकडे पूर्वीप्रमाणे पाहू शकणार नाही.'

वेबसिरीजचे भाग येतात तसा विचार केला तर या कादंबरीचा भाग दोन असेल काय... म्याऊं?

— राधिका कुंटे

❖❖❖

तुकी मांजराकडून आलेली पत्रे

ओया बाय्दोर

भाषांतर
मकरंद साठे

किंमत
₹.४५०.००

पुस्तक खरेदीसाठी खाली दिलेला QR Code स्कॅन करा.

www.popularprakashan.com
https://shorturl.at/Y1l7p

amazon.in
https://shorturl.at/9urEZ

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

हार्दिक अभिनंदन..!

कवी प्रफुल्ल शिलेदार यांच्या ‘समुद्र पर दस्तक’ या हिंदी कविता संग्रहातील कवितांचे ओडिया अनुवाद ‘समुद्रारे कराघात’ या शीर्षकाअंतर्गत प्रकाशित झाले आहेत.

‘समुद्र पर दस्तक’मधील बऱ्याच कविता या **हरवलेल्या वस्तूचं मिथक** या शिलेदारांच्या मराठी कविता संग्रहातील कवितांचा हिंदी अनुवाद आहेत. हा मराठी कविता संग्रह पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आला होता. स्वतः शिलेदारांनीच या कवितांचा हिंदी अनुवाद केला होता. आता या कविता ओडिया भाषेतूनही प्रकाशित झाल्या आहेत. त्यानिमित्त प्रफुल्ल शिलेदार यांचे पॉप्युलर प्रकाशनातर्फे हार्दिक अभिनंदन!

या ओडिया अनुवादाविषयी शिलेदार यांनी व्यक्त केलेलं मनोगत त्यांच्याच शब्दांत...

आपल्या लेखनाचा अनुवाद होऊन दुसऱ्या भाषेत पुस्तक येणे ही कुठल्याही लेखकाकरता आनंदाची बाब असते. मी ज्याप्रमाणे इतर भाषांमधल्या लेखनाचा मराठी किंवा हिंदी अनुवाद करत असतो त्याचप्रमाणे माझ्याही कवितांचे इतर भाषेतील कवी-अनुवादकांनी त्यांच्या भाषेत अनुवाद केले आहेत. इंग्रजी आणि हिंदी सोबतच आतापर्यंत कन्नड आणि पंजाबी या दोन भाषांमध्ये माझ्या कविता संग्रहरूपात प्रकाशित झाल्या आहेत. यात आता ओडिया भाषेतील नव्या संग्रहाची भर पडली आहे.

'समुद्रारे कराघात' या शीर्षकाने माझ्या कवितांच्या ओडिया अनुवादांचे पुस्तक नुकतेच 'धौली बुक्स', भुवनेश्वर या नामवंत प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झाले. या कवितांचे ओडिया भाषेत अनुवाद स्वप्ना मिश्रा या भुवनेश्वर येथील ओडिया लेखिकेने केले आहेत. स्वप्ना मिश्रा या ओडिया साहित्यातील नव्या जाणिवेच्या कथाकार आणि कादंबरीकार आहेत. ओडिशातील कालाहंडी जिल्ह्यातील इंद्रावती प्रकल्पामुळे झालेल्या विस्थापनाच्या वेदनांचे चित्रण करणारी 'जाळं' ही त्यांची कादंबरी ओडिया साहित्य

जगतात गाजली आहे. त्यांच्या कथांनाही चांगला वाचकवर्ग लाभला आहे. ‘धौली बुक्स’ या प्रकाशनाचे प्रकाशक मनू दाश हे स्वतः ‘अनाम’ कविता आंदोलनातले नावाजलेले द्विभाषक कवी-अनुवादक तसेच ‘अनाम’ या इंग्रजी नियतकालिकाचे संपादक आहेत. त्यांचे ओडिया आणि इंग्रजीत कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत, तसेच अलीकडेच त्यांचे पेंग्विनतर्फे प्रकाशित झालेले ‘द बिग बुक ऑफ ओडिया लिटरेचर’ हे पुस्तक गाजते आहे. अशा लोकांनी कवितांचे अनुवाद करावे आणि दुसऱ्या भाषेत आपले पुस्तक यावे याचे समाधान वाटते.

‘समुद्रारे कराघात’ या पुस्तकाला ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ ओडिया लेखिका डॉ. प्रतिभा राय यांचा ब्लर्ब लाभला आहे. त्या लिहितात —

“Prafull Shiledar’s ‘Samudrare Karaghata’ is a compelling collection of poems that delves into the intricacies of human emotion and existence. With a voice that is both lyrical and illuminating, Shiledar masterfully

navigates the space between the personal and the collective. His verses are marked by a disarming simplicity, nuanced irony, and a fluid shift between anger and compassion. Deeply rooted in his surroundings and sensitive to the pulse of society, these poems reflect on identity and the human journey—offering a quiet yet powerful social critique wrapped in poetic grace."

— Dr. Pratibha Ray

माझ्याकरता अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे या ओडिया संग्रहाकरता माझे प्रिय कवीमित्र दिनकर मनवर यांचे अर्थपूर्ण मुखपृष्ठ लाभले आहे. लवकरच हा कवितासंग्रह अमेझॉनवर उपलब्ध होईल. अनुवादक स्वप्ना मिश्रा आणि प्रकाशक मनू दाश यांचे मन:पूर्वक आभार! अनुवादक स्वप्ना मिश्रा यांनी या संग्रहातील अनेक अनुवादित कविता वेगवेगळ्या नियतकालिकांमधून प्रकाशित केल्या आहेत.

ओडिया भाषक वाचकांना हा कविता संग्रह आवडेल असा विश्वास वाटतो.

***

प्रफुल्ल शिलेदार यांचे याआधी ***पायी चालणार, जगण्याच्या पसाऱ्यात, हरवलेल्या वस्तूचं मिथक*** *हे मराठीतील स्वतंत्र कविता संग्रह पॉप्युलर प्रकाशनाद्वारे प्रकाशित झाले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी इतर भाषेतील कवी-लेखकांच्या लेखनाचेही मराठी अनुवाद केले आहेत. हिंदीतील दिवंगत ज्येष्ठ कवी विनोद कुमार शुक्ल यांच्या 'अतिरिक्त नहीं' या कविता संग्रहाचा शिलेदारांनी केलेला* ***जास्तीचे नाही*** *हा मराठी अनुवादही पॉप्युलरने प्रकाशित केला होता.*

प्रफुल्ल शिलेदार यांचे पुनश्च हार्दिक अभिनंदन!

❖❖❖

प्रफुल्ल शिलेदार यांचे 'पॉप्युलर' कवितासंग्रह

हरवलेल्या वस्तूंचं मिथक

किंमत : रु. २२५.००

www.popularprakashan.com
https://rb.gy/t8nkpc

amazon.in
https://shorturl.at/PP0Xd

पायी चालणार

किंमत : रु. २२५.००

www.popularprakashan.com
https://shorturl.at/O5E6H

amazon.in
https://shorturl.at/Y27br

जगण्याच्या पसाऱ्यात

किंमत : रु. ११०.००

www.popularprakashan.com
https://shorturl.at/BFmzy

amazon.in
https://shorturl.at/BK4M0

जास्तीचे नाही : विनोदकुमार शुक्ल (अनु. प्रफुल्ल शिलेदार)

किंमत : रु. १६०.००

www.popularprakashan.com
https://l1nq.com/sa838d1

amazon.in
https://sl1nk.com/qf1gw2v

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

A Couple of Different Strokes

Vinayak. B. Pathare & Prema V. Pathare

Text by
Sandeep Dahisarkar

Foreword by
Suhas Bahulkar

विनायक पाठारे आणि प्रेमा पाठारे हे स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेले आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रशैलीने कलाजगत गाजवलेले एक मराठमोळे चित्रकार जोडपे. चित्रकला हा दोघांमधला समान धागा आणि ध्यास; परंतु त्यासमीप पोचण्याचे त्यांचे मार्ग मात्र भिन्न. विनायक यांच्या चित्रांमध्ये एकप्रकारचे स्थैर्य जाणवते तर प्रेमा यांच्या लँडस्केप्समध्ये चापल्य.

एकमेकांविषयी आत्यंतिक प्रेम व आदर असणारे, तरीही परस्परांचे अनुकरण न करणारे हे पाठारे दांपत्य तहहयात एक चित्रव्रतस्थ जीवन जगले.

*परंतु त्यांच्या या भरीव योगदानाची पुरेशी दखल याआधी घेतली गेली नाही. त्यांच्या या चित्रमय जगताची आणि अनोख्या जीवनप्रवासाची आजवर अज्ञात राहिलेली कहाणी संदीप दहिसरकर यांनी **A couple of different strokes** पुस्तकातून थोडक्यात पण अतिशय नेमकेपणाने उलगडली आहे.*

भारतातील कलाप्रेमींना सुपरिचित असे पुरातत्त्वशास्त्रज्ञ, इतिहासकार व कलासमीक्षक संदीप दहिसरकर यांचे **A couple of different strokes** हे कलास्वादावरील अगदी वेगळ्या धाटणीचे इंग्रजी भाषेतील पुस्तक नुकतेच पॉप्युलर प्रकाशनाद्वारे प्रसिद्ध झाले. हे पुस्तक कॉफीटेबल स्वरूपाचे असून त्याला कला अभ्यासक आणि ज्येष्ठ चित्रकार सुहास बहुळकर यांची माहितीपूर्ण प्रस्तावना लाभली आहे.

चार विभागांतून दहिसरकरांनी या पाठारे दाम्पत्याचा प्रवास उलगडला आहे. पहिल्या विभागात विनायक पाठारे यांच्या वैयक्तिक आयुष्यातील काही महत्त्वाच्या घडामोडींचा धांडोळा घेतला आहे. दुसऱ्या विभागात २१ जानेवारी १९३५ ते जुलै १९३५ या कालावधीत पाठारे यांनी सायकलीवरून केलेल्या मुंबई ते पेशावर या प्रवासातील थरार आपल्याला अनुभवायला मिळतो. वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी विनायक यांनी एकट्याने सायकलवरून मुंबई ते पेशावर असा ६ महिन्यांचा प्रवास केला. त्यात तब्बल ३८ शहरांमध्ये त्यांचा मुक्काम होता. या प्रवासादरम्यान त्यांनी जवळपास

दिडशे-दोनशे चित्रे रेखाटली. कितीतरी संस्थानिक, ब्रिटीश अधिकारी आणि युरोपियन चित्रकार त्यांच्या चित्रनैपुण्यावर बेहद खुश झाले. सर्वांनी, त्यांची प्रवासात काढलेली चित्रे तर विकत घेतलीच; पण त्यांना वेळोवेळी शिफारसपत्रेही दिली. विनायक पाठारे हे स्वतः उत्तम लेखकही होते. आपल्या प्रवासाचा विस्तृत लेखाजोखा मांडणारे एक सदर त्यांनी 'विहार' नावाच्या साप्ताहिकातून १९३५ साली प्रसिद्ध केले. त्यातील आज उपलब्ध असलेल्या केवळ दहाच छापील लेखांमधून दहिसरकर यांनी पाठारे यांच्या या प्रवासाचा आढावा घेतला आहे.

तिसऱ्या विभागाची सुरुवातच विनायक आणि प्रेमा पाठारे यांच्या लग्नसमारंभाने आणि पर्यायाने पूर्वाश्रमीच्या प्रेमा सुभेदार यांच्या विनायक पाठारे यांच्या आयुष्यातील पदार्पणाने होते. या विभागात त्यांच्या सहजीवनातील काही महत्त्वाच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक घडामोडींचा लेखाजोखा मांडलेला आहे. तर, चौथ्या विभागात सुरुवातीला प्रेमा पाठारे यांच्या चित्रकलेतील कारकिर्दीवर झोत टाकलेला आहे आणि त्यानंतर विनायक पाठारे यांच्या

कारकिर्दीतील महत्त्वाच्या टप्प्यांचा प्रवास त्यांच्या चित्रांतून घडवला आहे.

या पुस्तकात संदीप दहिसरकरांनी या चार विभागांनंतर विनायक आणि प्रेमा पाठारे या उभयतांच्या आयुष्यातील टिपलेली काही महत्त्वाच्या प्रसंगांची छायाचित्रे, तसेच दोघांनी चितारलेली पोर्ट्रेट्स-लॅण्डस्केप्स, दोघांना प्रदान केलेली पारितोषिके-पदके, प्रमाणपत्रे, शिफारसपत्रे, काही मान्यवरांनी-परिचितांनी त्या दोघांना तसेच त्या दोघांनीही इतरांना लिहिलेल्या पत्रांचे फोटो दिलेले आहेत. याव्यतिरिक्त शेवटी तीन परिशिष्टेही जोडली आहेत. यांतील पहिल्या परिशिष्टात विनायक पाठारे यांनी चितारलेल्या पोर्ट्रेट्सची यादी, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या विभागांत विनायक आणि प्रेमा या उभयतांस मिळालेले पुरस्कार आणि मान्यवरांच्या शिफारशी वगैरेंची यादी दिलेली आहे.

५ जुलै १९१० साली जन्मलेल्या विनायक पाठारे यांनी सुरुवातीला त्यावेळचे सुप्रसिद्ध चित्रकार हळदणकर यांच्या कलामंदिरात चित्रकलेचे शिक्षण घेतले. पुढे

लंडनमध्ये ‘ड्युग्डेल’ या विख्यात चित्रकाराकडे अनुभवसिद्ध उमेदवारीची सुसंधी त्यांना मिळाली. पुढे पाठारे यांनी चित्रकलेच्या प्रत्येक विभागात प्रावीण्य मिळवले. परंतु पोर्ट्रेटस हा मात्र त्यांचा कायमच जिव्हाळ्याचा विषय राहिला. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड, ग्वाल्हेरचे सरदार घोरपडे अशा राजेमहाराजांपासून पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, मराठी साहित्यिक प्र. के. अत्रे, गदिमा, मामा वरेरकर तसेच समाजसुधारक महात्मा फुले, चीफ जस्टीस देसाई, ते अगदी सामान्य माणसांचीसुद्धा विपुल पोर्ट्रेट्स त्यांनी केली. महाराष्ट्र विधानसभेच्या नवीन इमारतीसाठी त्यांनी केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पोर्ट्रेट विशेष गाजले.

विनायक पाठारे यांची गाजलेली पोर्ट्रेट्स.

पूर्वाश्रमीच्या प्रेमा सुभेदार यांचा जन्म १९१८ सालचा. पार्ले-टिळक विद्यालयाच्या त्या माजी विद्यार्थिनी. खरंतर त्याकाळी, शालेय शिक्षणानंतर स्त्रियांनी चित्रशाळेत जाऊन चित्रकलेचे रीतसर शिक्षण घेणे हे आजच्यासारखे सरसकट नव्हते. प्रेमा सुभेदार यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सचा चार वर्षांचा कोर्स पूर्ण करून चित्रकलेची पदविका घेतली आणि त्यानंतरच, म्हणजे १९४१ला त्या विनायक पाठारेंशी विवाहबद्ध झाल्या. आपल्या ५६ वर्षांच्या सहजीवनात, दोघांनी मिळून केलेल्या भारतभ्रमंतीत लखनौचे रस्ते, वाराणासीतले घाट, अलिबागचा समुद्रकिनारा, थळचा मत्स्यबाजार.. अशी कितीतरी ठिकाणे, त्यांनी आपापल्या कॅनव्हासवर स्वतंत्रपणे चितारली.

१९९७ साली प्रेमा पाठारे निवर्तल्या आणि २००५ साली वयाच्या ९५व्या वर्षी विनायक पाठारे यांनी जगाचा निरोप घेतला. विनायक यांनी आपल्या तब्बल सात दशकांच्या कारकिर्दीत जवळपास आठ हजार चित्रे काढली, ज्यात बहुतांशी पोर्ट्रेटस होती. तर प्रेमा यांनी आपल्या चार दशकांच्या कारकिर्दीत चार ते पाच हजार चित्रे रेखाटली.

आता त्यांच्यामागे उरली आहेत ती या दोघांची नजर खिळवून टाकणारी ही अप्रतिम चित्रेच. पाठारे दांपत्य हे स्वातंत्र्यपूर्व काळातले, एकमेव भारतीय चित्रकार जोडपे ज्यांनी तत्कालीन भारतीय कलाविश्वात स्वतः चे खास स्थान निर्माण केले. त्यामुळे त्यांचा हा विपुल चित्रऐवज सर्व कलाप्रेमींच्या दृष्टिपथात यावा, सर्व रसिकांकरिता तो उपलब्ध व्हावा आणि मुख्य म्हणजे या दाम्पत्याच्या कलासाधनेची नोंद घेतली जावी, हा विनायक पाठारे यांचे सुपुत्र शिरीष पाठारे यांचा ध्यास होता. त्यांच्या या ध्यासाला संदीप दहिसरकर या मर्मज्ञ कलातज्ज्ञाच्या डोळस मेहनतीची जोड मिळाली.

शिरीष पाठारेंकडील उपलब्ध चित्रे, पत्रव्यवहार, फोटो या साधनांवरच निवळ विसंबून न राहता, दहिसरकर भारतभर फिरले. विनायक पाठारेनिर्मित अस्सल चित्रांचा वेध घेऊन त्याविषयीची माहिती त्यांनी संकलित केली, तिची विश्वासार्हता पडताळून पाहिली. जुनी पुस्तके, विनायक पाठारेंच्या मुलाखती व अन्य दस्तावेजांचा चिकाटीने पाठपुरावा करून हा ग्रंथराज अखेर सिद्ध केला.

चित्रांखेरीज, कृष्ण-धवल फोटो, पत्रे, संदर्भसूची, विनायकरावांचे कलाविचार यांमुळे पुस्तक जुन्या काळाची प्रत्यक्ष सफर घडवून आणते.

पुस्तकाच्या मुखपृष्ठावर विनायक पाठारे यांनी १९३७ साली केलेले सरदार घोरपडे यांचे देखणे पोर्ट्रेट आहे, तर मलपृष्ठावर प्रेमा पाठारे यांच्या कुंचल्यातून स्टील शैलीतील रसरशीत 'जास्वंदी' उमलली आहे. पुस्तकाला एकत्र बांधून ठेवणाऱ्या मुखपृष्ठ व मलपृष्ठ या एकाच पुस्तकाच्या दोन स्वतंत्र पण अजोड बाजू विनायक आणि प्रेमा पाठारे यांच्या चित्रांचे एकमेकांपासून भिन्न तरीही संलग्न-समांतर स्थान दर्शवतात. **A couple of different strokes** या शीर्षकाची सार्थकता त्यात अचूकपणे अधोरेखित होते.

❖❖❖

संदीप दहिसरकर लिखित A Couple of Different Strokes या पुस्तकाचे प्रकाशन ३१ मे २०२६ रोजी नॅशनल गॅलरी ऑफ मॉर्डन आर्ट, फोर्ट येथे श्री. कुमार केतकर, श्री. सुहास बहुळकर, श्री शिरीष पाठारे आणि पॉप्युलर प्रकाशनाचे संचालक श्री. रामदास भटकळ यांच्या हस्ते पार पडले.

***

*कला इतिहासकार व लेखक संदीप दहिसरकर यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची महाराष्ट्र लोकभवन येथे भेट घेऊन त्यांना **A Couple of Different Strokes** हे नवे पुस्तक भेट दिले. यावेळी ज्येष्ठ चित्रकार व्ही. बी. पाठारे आणि प्रेमा पाठारे यांचे सुपुत्र वास्तुविशारद शिरीष पाठारे तसेच पॉप्युलर प्रकाशनच्या अस्मिता मोहिते उपस्थित होत्या.*

A Couple of Different Strokes

Vinayak. B. Pathare & Prema V. Pathare

Text by
Sandeep Dahisarkar

Foreword by
Suhas Bahulkar



MRP
₹. 2500/-

पुस्तक खरेदीसाठी खाली दिलेला QR Code स्कॅन करा.

www.popularprakashan.com
https://shorturl.at/3sBCk

amazon.in
https://shorturl.at/ZRQM3

BAKING MANTRA

CAKES

Your guide to baking perfect cakes in the Indian kitchen

SHILPA SETH BHAMBRI

Foreword by Rashmi Uday Singh

पुस्तकाचा दिमाखदार प्रकाशन समारंभ

***Baking Mantra CAKES* हे पुस्तक 'पॉप्युलर प्रकाशन' आणि 'ऑथर्सअपफ्रंट' (Authorsupfront) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित करण्यात आले आहे.**

भारतीय स्वयंपाकघरासाठी उपयुक्त अशा पाककृती, तंत्रे आणि विशेष माहितीचा समावेश असलेले हे पुस्तक केक प्रेमी, घरगुती बेकर्स, पाककलेचे विद्यार्थी आणि बेकिंग क्षेत्रातील उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांसाठी एक व्यावहारिक व रंजक मार्गदर्शक ठरेल. या कार्यक्रमाच्या दिमाखदार प्रकाशन सोहळ्याचा हा वृत्तांत.

मुंबईतील ‘व्हाइट क्रो बुक्स अँड कॉफी’ (जिओ वर्ल्ड ड्राइव्ह) येथे शेफ शिल्पा सेठ भामरी लिखित Baking Mantra Cakes या पुस्तकाचे प्रकाशन एका उत्साही वातावरणात पार पडले. या कार्यक्रमात खाद्यप्रेमी, ब्लॉगर्स, इन्फ्लुएन्सर्स, बेकरी क्षेत्रातील व्यावसायिक, उत्साही होम बेकर्स आणि वाचक एकत्र आले होते. केक, बेकिंग, पुस्तके आणि गप्पांची मैफल असलेला एक रंगतदार सोहळा प्रकाशन कार्यक्रमानिमित्ताने रंगला होता. प्रसिद्ध खाद्य समीक्षक आणि लेखिका रश्मी उदय सिंग यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यांनी बेकिंग, खाद्यसंस्कृती आणि पाककलेच्या क्षेत्रातील बदलत्या प्रवाहांवर अतिशय रंजक आणि अभ्यासपूर्ण चर्चा केली.

‘पिल्सबेरी इंडिया’ (Pillsbury India) यांच्या सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम केवळ पुस्तकाच्या औपचारिक प्रकाशनापुरता मर्यादित नव्हता. ऐश्वर्या राज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित एक पाककला-विषयक परिसंवाद या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला. त्यांनी लेखिका शिल्पा सेठ भामरी, रश्मी उदय सिंग आणि ४५ हून अधिक पाहुण्यांचा समावेश असलेल्या उत्साही प्रेक्षकवर्गामध्ये चर्चा घडवून आणली.

या संवादादरम्यान आजच्या खाद्यविश्वात बेकिंगचे महत्त्व, होम बेकर्समध्ये केकबद्दल वाढती आवड, डेझर्ट्स (गोड पदार्थ) बद्दल लोकांची असलेली भावनिक जवळीक आणि नवशिक्या तसेच गंभीर बेकिंग प्रेमींना मार्गदर्शन करण्यात **Baking Mantra CAKES** सारख्या पुस्तकांची भूमिका यावर चर्चा करण्यात आली.

या कार्यक्रमाचे एक खास आकर्षण म्हणजे 'पर्सनलाइज्ड बुक साइनिंग' (वैयक्तिक स्वाक्षरी सत्र) होते; यात शेफ शिल्पा यांनी पुस्तक खरेदी करणाऱ्या पाहुण्यांसाठी खास संदेश लिहिले, ज्यामुळे हा अनुभव अविस्मरणीय झाला.

कार्यक्रमात शेफ शिल्पा यांनी स्वतः तयार केलेल्या खास 'आर्टिसनल बेक्स'चा (विशेष बेकिंग पदार्थांचा) आस्वाद घेण्यासाठी एक 'टेस्टिंग टेबल'ही ठेवण्यात आले होते. पाहुण्यांनी 'फजी ओव्हरलोड ब्राउनीज', 'ग्लूटेन-फ्री आल्मंड फ्लोअर ऑरेंज चॉकलेट केक' आणि 'ब्लूबेरी क्रम्बल केक विथ फ्रेश लेमन फ्रॉस्टिंग' यांचा आनंद घेतला.

तसेच, बुकस्टोअरमधील 'नंदन कॉफी' किओस्कवरून पाहुण्यांनी त्यांच्या आवडत्या कॉफीचा आस्वाद घेतला; यामुळे पुस्तके, कॉफी आणि केक यांचा एक उत्तम मेळ साधला गेला.

या प्रकाशन सोहळ्यात उपस्थितांना भेटवस्तू आणि बक्षिसांसह अनेक रंजक क्षण अनुभवता आले. सर्व पाहुण्यांना 'प्रोटिनोज न्यूट्रिशन' (Proteinoz Nutrition), 'कँडी फॅक्टरी' (Kandee Factory) आणि 'क्राउन फूड्स' (Crown Foods) यांच्याकडून भेटवस्तू देण्यात आल्या. नशीबवान होम बेकर्सना 'पिल्सबेरी प्रीमिक्स' देण्यात आले, तर प्रश्न-उत्तर सत्रात सहभागी झालेल्या प्रेक्षकांना शेफ शिल्पा यांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

हे पुस्तक पॉप्युलर प्रकाशनाच्या www. popularprakashan.com या वेबसाईटसह अमेझॉनवरही विक्रीसाठी उपलब्ध आहे.

❖❖❖

Includes Egg-free recipes

BAKING MANTRA

CAKES

Your guide to baking perfect cakes in the Indian kitchen

Foreword by Rashmi Uday Singh

Cakes, cupcakes, brownies... hungry yet?



MRP ₹. 550/-

BUY NOW !

www.popularprakashan.com
https://shorturl.at/w1ToR

amazon.in
https://shorturl.at/ODdYs

दास्तान-ए-तुर्की

‘पॉप्युलर प्रकाशन’ हे मागील काही वर्षांपासून उत्तमोत्तम निवडक तुर्की साहित्याचा आणि त्यातही मुख्यत्वे तुर्की कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद वाचकांकरिता घेऊन येत आहे. अशाच काही मराठी अनुवादित तुर्की कादंबऱ्यांच्या परिचयाची लेखमाला - ‘दास्तान-ए-तुर्की’ - आपण ‘प्रिय रसिक’मध्ये सुरू केलेली आहे. या सर्व कांदबऱ्या विविध बाजाच्या, विषयाच्या, शैलीच्या आणि मुख्य म्हणजे वाचकांना खिळवून ठेवून खऱ्या अर्थाने वाचनानंद देणाऱ्या आहेत. या मालेतील सर्व कादंबऱ्यांचा परिचय प्रवीण कलंत्री हे एक रसिक-वाचक करून देत आहेत.

नक्षी-दार

ओया बाय्दोर

अनुवाद : जयश्री हरि जोशी

पत्रकार, संपादिका, लेखिका असणाऱ्या ओया बाय्दोर अगदी तरुण वयातच राजकीय क्षेत्रात गेल्या. त्या तुर्की कम्युनिस्ट पक्ष आणि तुर्की कामगार पक्षाशी जोडल्या गेल्या. तुर्की शिक्षक संघटनेतही त्या सक्रिय होत्या. बाय्दोर यांनी आपल्या लेखनात तुर्कीच्या आधुनिक इतिहासातील लष्करी बंड, निर्वासन, हिंसा आणि राष्ट्रवाद असे प्रश्न हाताळलेले आहेत. त्यांचे साहित्य वाचकांना सामाजिक जागरूकता आणि मानवीय दृष्टिकोनातून विचार करण्यास प्रवृत्त करते.

इर्गुवान कापिसे या मूळ तुर्की भाषेतील कादंबरीचा जगातील वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुवाद झालेला आहे. ऐंशी-नव्वदीच्या दशकात तुर्कस्तानमध्ये अंत्यंत अस्थिर राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हे कथानक घडतं. 'इर्गुवान कापिसे' म्हणजे 'जांभळ्या फुलांचा दरवाजा'

इस्तंबूलमध्ये बालपण गेलेला टेओ अमेरिकेत राहतो. तो इतिहास-संशोधक आहे. एका जुन्या हस्तलिखितात त्याला बायझेंटीन काळातील (ऑटोमन साम्राज्यापूर्वीचा काळ) इस्तंबूलमधील जुदास वृक्षाची नक्षी असलेल्या एका प्रवेशद्वाराचा उल्लेख सापडतो. त्या प्रवेशद्वाराचा शोध घेण्यासाठी तो इस्तंबूलमध्ये येतो. इथे आल्यावर त्याच्या लहानपणीच्या आठवणी वर उफाळून येतात. इथेच त्याला त्याच्याच क्षेत्रातला त्याचा सहकारी मेते भेटतो. प्रवेशद्वार शोधण्यात तो त्याची मदत करायलाही तयार होतो आणि सोबत असलेल्या एका मुलीशी – देरिनशी - ओळख करून देतो. ती त्याला राहण्यासाठी आपल्या सावत्र आईचे - उयुल्कूचे - घर सुचवते. सध्या तिची आई पॅरिसला राहत होती. तिचा तरुण मुलगा, देरिनचा सावत्र भाऊ, उमुट पोलीस चकमकीत मारला गेला होता. त्या चकमकीत तीन जण मारले गेले होते. चौथा पळून गेला होता. त्या चौथ्या मुलाचा शोध लागल्यावर पोलिसांनी या निर्दोष मुलांवर गोळीबार का केला, या मुलांना दहशतवादी कसं काय ठरवलं हे समजणार होतं.

देरिनलासुद्धा मारल्या गेलेल्या या मुलांबद्दल विशेषतः उमुटच्या बाबतीत पोलीस चकमकीअगोदर नेमकं काय घडलं हे जाणून घ्यायचं होतं. म्हणजे तिच्या वडिलांच्या हत्येमागचं कारण समजेल असं तिला वाटत होतं. तिचे वडील परराष्ट्र खात्यात उच्चपदस्थ अधिकारी होते. काही पत्रकारांच्या मते अनेक सरकारविरोधी लोक, ज्यांना सहजपणे दहशतवादी म्हटलं जायचं, त्यांच्या हत्या देरिनच्या वडिलांच्या इशाऱ्यावर झाल्या होत्या. मात्र तिला हे पटत नव्हतं. पोलिसांच्या चकमकीत मारला गेलेला सावत्र भाऊ आणि सरकारविरोधी संघटऩाकडून मारले गेलेले वडील ही दोन्ही प्रकरणं एकमेकांशी निगडित आहेत असं तिला वाटत होतं. उयुल्कू आणि देरिन या दोघीही एकाच घटनेचा शोध घेत होत्या, परंतु वेगवेगळ्या पद्धतीने. पुढे केरेम अलीच्या संपर्कात आल्यावर देरिनला संघटनेतील लोकांबद्दल विशेषतः स्त्रियांबद्दल सहानुभूती वाटायला लागते.

केरेम अली हा तरुण सरकारविरोधी संघटनेचा सदस्य आहे. त्या मारल्या गेलेल्या तिघांपैकी एक त्याचा मोठा भाऊ होता. संघटनेच्या कामासाठी देरिनचं श्रीमंतीचं राहणीमान

आणि उच्च वर्गातील लोकांची माहिती मिळवण्यासाठी संघटनेकडून त्याला देरिनशी संबंध वाढवायला सांगितलं जातं आणि इतिहास-संशोधक टेओला सीआयएचा एजंट समजून त्याच्यावर लक्ष ठेवायला सांगतात. देरिनशी मैत्री वाढवताना स्वतःच्याही नकळत तो देरिनच्या प्रेमात पडतो.

टेओ, उयुल्कू, देरिन, केरेम अली हे सगळेजण कशाच्या न कशाच्या शोधात आहेत. मात्र त्यांचे शोधाचे मार्ग एकमेकांना छेदत असतात. ही एक अनेक स्तरांची शोधकथा आहे, ज्यात इतिहास, राजकारण, आणि वैयक्तिक संघर्ष यांचा समावेश आहे. सरकारी दडपशाही विरुद्ध सरकारविरोधी संघटनांचे लढे, या लढ्याला सर्वसामान्य नागरिकांचा पाठिंबा, उपोषणाद्वारे प्राणदान करून शहीद होणाऱ्या स्त्रिया आणि या संघटनांना, विरोध करणाऱ्यांना दहशतवादी ठरवून त्यांचं हत्याकांड घडवून आणणारे सरकारी अधिकारी, हे सगळं विचलित करणारं आहे. सामाजिक अन्याय, राजकीय संघर्ष याचं अत्यंत भेदक चित्रण केलेलं आहे. राजकीय अस्थिरता असताना सर्वसामान्यांची कशी परवड होते, हे अधोरेखित होतं.

अधुनमधून काव्यात्मक वाटली तरीही अत्यंत वास्तववादी शैलीमुळे आणि मुख्य चार पात्रांच्या निवेदनातून गुंतागुंतीचं, रहस्यमय कथानक उलगडताना वाचकांना वेगळा दृष्टिकोनसुद्धा दिसतो. इतिहास आणि वर्तमान याची इतकी बेमालूम सांगड घातली आहे की कुठेही कथानकाचा वेग मंदावत नाही.

मराठी अनुवाद सुलभ, प्रवाही आणि भावस्पर्शी झालेला आहे. तुर्की भाषेतील पात्रांच्या भावभावना व सांस्कृतिक संदर्भ अनुवादात अगदी नेमकेपणाने आलेले आहेत. शिवाय शेवटी तुर्की भाषेतील शब्दांच्या अर्थाचं परिशिष्ट असल्यामुळे संदर्भ स्पष्टपणे लक्षात येतात.

❖❖❖

नक्षी-दार

ओया बाय्दोर

अनुवाद : जयश्री हरि जोशी

पुस्तक खरेदीसाठी खाली दिलेला
QR Code स्कॅन करा.

www.popularprakashan.com
https://shorturl.at/8pOFp



किंमत
₹.४७५.००

सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक हर्ष भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. यांचेकरिता
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ येथे प्रसिद्ध केले. संपादक : अस्मिता मोहिते.